**प्रेसनोट** दि. 13/07/2026

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून चाकण उत्तर पोलीस स्टेशन येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | निगडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय गु.रजि.नं. 446/2026 |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अन्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष वय 54 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | श्री. तानाजी शिवाजी कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक, चाकण उत्तर पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय **(वर्ग-2)**, रा.ठि.- रुणाल गेट वे सोसायटी, ई टॉवर, फ्लॅट नं.303, मुकाई चौक, रावेत, पिंपरी चिंचवड, पुणे, मूळ पत्ता- मु पोस्ट- गाडेगाव, तालुका बार्शी, जिल्हा सोलापुर. |
| **सुरवातीची लाच मागणी** | 10,00,000/- (दहा लाख रूपये) लाच मागणी केली. |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | 5,00,000/- (पाच लाख रूपये) लाच मागणी केली. |
| **पडताळणी दिनांक** | दिनांक 13/05/2026 रोजी |
| **ठिकाण** | श्रीकृष्ण व्हेज हॉटेल, सेक्टर नं. 25, निगडी, पुणे. |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 7722011255) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9552574140) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे पुणे परिसरात जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. तक्रारदार आणि त्यांचा मुलगा यांचे विरोधात जमीन खरेदी विक्री व्यवसायाच्या अनुषंगाने चाकण उत्तर पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे दोन तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत. यातील आरोपी लोकसेवक स.पो.नि. श्री तानाजी कदम हे चाकण उत्तर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असून तक्रारदार व त्यांच्या मुलाच्या विरूद्ध प्राप्त झालेले दोन्ही तक्रार अर्ज त्यांच्याकडे चौकशीला होते. नमूद दोन्ही तक्रार अर्ज वरिष्ठांना सांगून दिवाणी स्वरूपाचे असल्याचे दाखवून निकाली काढण्यासाठी आ.लो.से. श्री तानाजी कदम यांनी वरिष्ठांसाठी तक्रारदाराकडे 10,00,000/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार, तक्रारदार यांनी दिनांक 13/05/2026 रोजी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिली होती.

वरील प्रमाणे तक्रार प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मार्फत तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 13/05/2026 रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान आरोपी लोकसेवक स.पो.नि. श्री तानाजी कदम यांनी तक्रारदार यांना सदर दोन्ही अर्ज वरिष्ठांकडून निकाली काढण्यासाठी तक्रारदाराकडे प्रथम 10,00,000/- रूपयाची लाच मागणी करून तडजोडीअंती 5,00,000/- रूपयाच्या लाचेची मागणी केली तसेच पहिल्या टप्प्यात 2,50,000/- रूपये व तक्रारदाराविरूद्ध आलेला अर्ज निकाली काढल्यानंतर 2,50,000/- रूपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

यातील आरोपी लोकसेवकाविरूद्ध निगडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे गु.रजि.नं. 446/2026, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन अ‍ॅप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

13/7/2026

**दयानंद गावडे**
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.